# राज्यव्यवस्थेच्या माध्यमातून मानवाधिकारांचा विकास

**डॉ अरुण चव्हाण**, भोगावती महाविद्यालय, कुरुकली.

...................................................................................................................................

**प्रस्तावना..**आधुनिक काळामध्ये मानवाला स्थैर्य आले आहे. मानवी जीवनाला किंमत प्राप्त झाली आहे. त्याचबरोबर मानवी जीवनाला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. समाजामध्ये अशा प्रकारचे मानवी अस्तित्व टिकवून ठेवणे म्हणजेच मानवाला त्याच्या जीवनाविषयी आत्मीयता वाटेल अशा प्रकारचे वातावरण निर्माण करणे आदिम काळापासून आजपर्यंत मानवाच्या जीवनात प्रचंड बदल झाले. त्याच्यामध्ये अनेक विकासात्मक बदल झाले. मानव समाजामध्ये प्रवेश करीत असतानाच त्याच्या गरजा स्पष्ट होतात मानवी जीवनात, समाजात ज्याप्रमाणे अनेक स्थितंतरे घडून आली. त्याचप्रमाणे मानवासमोर प्रत्येक स्थितंराबरोबर आव्हाने निर्माण झाली. मानवाने या सर्वासमोर यशस्वी पणे झुंज दिली. त्यामुळेच मानव बदलाच्या आणि विकासाच्या प्रक्रीयेत टिकून राहिला. मानवामध्ये गरजेप्रमाणे बदल घडवून आणण्याची प्रवृत्ती आहे. यामुळेच संपूर्ण मानवजाती सुखी व समृध्द बनली आहे.मानवाला निसर्गातून मिळालेल्या अधिकारातून व स्वातंत्र्यामधून मानव आपला योग्य प्रकारे विकास करत असतो. निसर्गत: मानव समान असून निसर्गाने मानवामध्ये भेदभाव केलेला नाही निसर्गाने अस्तित्वात आलेल्या सर्व प्राणीमात्रांना जगण्याच्या कला व विकसीत होण्याची प्रक्रीया प्रदान केलेली आहे. निसर्गावस्थेत मानवाला सर्व प्रकारची स्वातंत्र्ये मिळत असत. या अवस्थेमध्ये व्यक्तीला जीवीताचा आर्थिक आणि स्वातंत्र्याचा पूर्ण हक्क होता. या काळामध्ये मानवी जीवन स्वच्छंदी, आनंदी व बंधनमुक्त होते. हॉब्ज, लॉक, रुसो या सामाजिक कराराच्या पुरस्कर्त्यानी निसर्गातील मानवाच्या वरील अवस्थेचे जोरात समर्थनच केले आहे.

प्रसिध्द विचारवंत जॉन लॉक यांनी म्हटले आहे की, मानवाला जिविताचा, स्वातंत्र्याचा आणि आर्थिक अधिकार निसर्गातूनच प्राप्त झालेला आहे. मानवाचे अधिकार क्षेत्र अत्यंत व्यापक असून त्यामध्ये राजनैतिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिकारांचा समावेश आहे.मानवी हक्कांचा विचार करत असताना सामान्य मानवाला समाजात प्रतिष्ठेने जगण्यासाठी अधिकारांची गरज असते कारण अधिकारामुळे किंवा हक्कामुळेच मानवाच्या जीवनाला संरक्षणाचे कवच लाभते. मानव निर्भयपणे आपले जीवन स्वत:च्या इच्छेनुसार जगू शकतो. आपली प्रगती स्वत:च्या क्षमतेनुसार करु शकतो तसेच आर्थिक प्रगती स्वत:च्या गतीने करुन समाजातील शोषण करणाऱ्या घटकांपासून आपले संरक्षण करु शकतो. मानवी हक्कांच्या जोरावरच स्त्री–पुरुष समानता, शोषणमुक्त समाज, संपूर्ण आर्थिक विकास, कायद्याचे आधिराज्य,लोकशाहीचा विकास, वृध्द व बालकांना समाजात सन्मानाचे स्थान, समान काम, समान वेतन, विश्वबंधुता या सारख्या संकल्पना अस्तित्वात येतील. यामुळेच मानवी जीवन सुसह्य होऊन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल.

**ऐतिकासिक पार्श्वभूमी:–**प्राचीन ग्रीक काळामध्ये मानवी हक्कांना नैसर्गिक हक्क म्हणून संबोधले जात होते. ग्रीक नाटक Anrigme मध्ये सोकोकेल्सने लिहले आहे की Anrigme च्या भावाने राजाच्या विरोधात बंड केले व त्यामध्ये तो मारला गेला राजा सेरॉन ने त्याच्या मृत्युनंतरच्या विधीला बंदी घातली तरी सुध्दा Anrigme ने विधी पूर्ण केले. यानंतर Anrigme ला अटक झाली. परंतु, त्याने आपण केलेल्या कृत्याबद्दल सफाई देताना सांगितले की त्याने जी कृती केली ''ती अमूर्त अशा स्वर्गातील अलिखित कायद्याप्रमाणे केली असून ज्या कायद्यावर राजाची सुध्दा सत्ता चालत नाही'' यावरुन स्पष्ट दिसून येते की प्रस्थापित असणाऱ्या ग्रीक राजाच्या सत्तेपेक्षा देखील दैवी किंवा नैसर्गिक सत्ता महत्वाची असते ज्याच्यामुळे व्यक्तीला मिळालेले अधिकार प्रस्थापित राज्यव्यवस्थेपेक्षा श्रेष्ठ असतात. अशाच प्रकारे मानवाला मानवी हक्क नैसर्गिक हक्कांमधूनच प्राप्त झाले आहेत.नैसर्गिक हक्कांच्या विकासाच्या तत्वज्ञानाचा विचार करता स्टॉईक तत्ववेत्त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांनीच सर्वात प्रथम नैसर्गिक न्याय सिध्दांत मांडला. त्यांच्या मते प्रत्येक मानवाला नैसर्गिक हक्क आहेत कारण तो मानव आहे. परंतु, याही अगोदर ग्रीक नगरराज्यातील नागरिक नैसर्गिक न्याय संकल्पाने अगोदर काही हक्कउपभोगतहोते.असेस्टॉईकविचारवंताचे मतआहे ते खालीलप्रमाणे .............. (Isogonia) २) कायद्यासमोर समानतेचा अधिकार (Isogonia) ३) सर्वाना समान सन्मान (Isogonia) स्टॉईक विचारवंतानी ग्रीक नगरराज्यांच्या पाडावानंतर नैसर्गिक कायद्याचा सिध्दांत मांडला त्यांच्या मते नैसर्गिक न्यायाचे तत्वज्ञान संपूर्ण जगामध्ये अस्तित्वात आहे. म्हणजेच याची अंमलबजावणी कोणा एका व्यक्तीसाठी किंवा गटासाठी कोणत्याही एका राज्यासाठी नसून जगातील सर्वाना सर्व ठिकाणी लागू होतो. त्यांच्या मते प्रत्येक मानवाने नैसर्गिक कायद्याचे पालन केले पाहिजे कारण त्यांचे जगातील स्थान समान असून स्वत:चा व आत्म्याचा विकास करण्यासाठी ते योग्यच आहे अशा प्रकारे स्टॉईक विचारवंतानी वैश्विक बंधुत्व, मानवतावाद, समानता, व स्वातंत्र्य सर्व जनतेसाठी असावे यावर भर दिला स्टॉईक विचारवंताच्या मते मानवाने आपला विकास सामाजिक व नैतिक दृष्टया केला पाहिजे सिसेरो (१०६–४३) ख्रिस्तपूर्व या स्टॉईक विचारवंताच्या मते नैसर्गिक कायद्याची अंमलबजावणी जागतिक स्वरुपात करुन तो न बदलणारा व कधीही नष्ट न होणारा आहे. आपण या कायद्यापासून कधीही मुक्त होऊ शकत नाही. त्याचबरोबर त्याची जबाबदारी आपण टाळू शकत नाही. रोमनांनी न्यायाचे प्रशासन करताना स्टॉईक विचारवंतानी मांडलेल्या नैसर्गिक न्याय विचारवंत घेऊन तयार केले हे रोमनांचे महत्वपूर्ण बौध्दीक योगदान आहे.मध्ययुगामध्ये अबेलार्ड (१०७९–११४२) आणि थॉमस अॅक्वायनस् यांनी नैसर्गिक

हक्कावर जोर दिला. त्यामुळे ॲक्वानयस् ला मानवी हक्काचा जनक मानले जाते. त्याच्यामते मानव जन्मत: नैसर्गिक हक्क घेऊन येतात. मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीला जात, धर्म, वंश, राष्ट्र, भाषा यांचा भेदभाव न करता मिळतात. मध्ययुगीन काळात व्यक्तीच्या जीवनावर अनेक बंधने होती कारण या काळात समाजजीवनावर धर्मसंस्थेचा प्रचंड प्रभाव होता. म्हणूनच युरोपच्या इतिहासात हा कालखंड अराजकतेचा कालखंड म्हणूनच ओळखला जातो. यामुळेच या परिस्थितीत मानवी हक्कांना स्थान गौण होते. परंतु मध्ययुगाच्या अखेरीत पुर्नजीवनाची चळवळ व धर्मसुधारणेची चळवळ या दोन चळवळीनीं समाजात मोठा बदल घडवून आणला त्यातुन व्यक्तीस्वातंत्र्याचा मुक्त अविष्कार होण्यास योग्य परिस्थीती निर्माण झाली. त्याच बरोबर स्वातंत्र्य आणि मानवी हक्क यांचा पुरस्कार केला.

**सामाजिक करार सिध्दांत:—**सोळाव्या शतकात व सतराव्या शतकात युरोपमध्ये नैसर्गिक हक्कांच्या रुपाने मानवी हक्कांचाच पुरस्कार केला गेला यासाठी हॉब्ज, लॉक रुसो यांनी पुढाकार घेतला त्याला यांनी सामाजिक कराराचे स्वरुप दिले. त्यांच्या मते मानव निसर्गावस्थेत होता त्यावेळी त्याला काही अधिकार होते. राज्य निर्मिती करत असताना या नैसर्गिक हक्कावर काही बंधने आली. परंतु, निसर्गावस्थेतील या हक्कांचे रक्षण रक्षण करण्याची जबाबदारी राज्यावर सर्वानी मिळून टाकली यामुळेच मानवाच्या हक्कांचे रक्षण करण्याचे कर्तव्य राज्याने पार पाडावे असे ठरले जॉन लॉक याच्या मते निसर्गावस्थेत नागरी समाज होता परंतु हा समाज राजकीय स्वरुपात रुपांतरीत झालेला नव्हता''या अवस्थेत नागरिकांना जीवित स्वातंत्र्याचा हक्क, मालमत्तेचा हक्क, आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क असे नैसर्गिक अधिकार होते व्यक्तीचे हे अधिकार सद्सद्विवेक बुध्दीवर आधारित होते यामध्ये व्यक्तीला स्वातंत्र्य, समानता, सहानुभूती अशा स्वरुपाची वागणूक मिळत होती. सहानुभूती, संरक्षण, समानता सहयोग इत्यादी गुण निसर्गावस्थेत आढळत होते. परस्परांचे हित साधणे, शांतता प्रस्थापित करणे, संपत्ती मिळविणे अशी निसर्गावस्थेतील मानवी जीवनाची स्थिती होती यावरुन असे स्पष्ट होते की मानवी हक्कांची सुरवात मानवाच्या निसर्गावस्थेपासूनच झालेली होती.

**फ्रेंच राज्यक्रांती व मानवी हक्क** फ्रेंच राज्यक्रांती अत्याचार आणि असमानतेच्या विरोधात झाली. भाषण स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, प्रकाशन व धार्मिक स्वातंत्र्य, फ्रान्स मध्ये अस्तित्वात नव्हते. तसेच व्यक्ती स्वातंत्र्य सुध्दा नव्हते. शासन कर्त्याची राज्यव्यवस्था सिध्दांतावर अवलंबून नव्हती तर ती शासन कर्त्याच्या इच्छेवर अवलंबून होती. अशा प्रकारे नागरीकांच्या हक्कांवर अतिक्रमण झाल्या मुळेच फ्रान्स मध्ये क्रांती सदृश्य परिस्थिती निर्माण झाली १६ व्या लुईच्या विरोधात फ्रान्स मध्ये क्रांती घडून आली व्हॉल्टेअर ने २६ ऑगस्टला राष्ट्रीय संसदेसमोर मानवी अधिकारांची घोषणा केली. मानवी हक्कांच्या दृष्टीकोनातून ही घोषणा अत्यंत महत्वाची होती. युरोपमध्ये सुरु झालेल्या सामाजिक क्रांतीचे ते द्योतक होते. फ्रान्स मध्ये उद्दाम बनलेली राजेशाही व त्यांनी जनतेचे केलेले शोषण यामधुनच फ्रान्स मध्ये क्रांती घडून आली. १६ व्या लुईच्या विरोधात झालेली क्रांती नागरीकांचे मुलभूत अधिकार आणि स्वातंत्र्य यासाठी झालेला संघर्ष होता. यातुनच संपूर्ण जगातील व युरोपमधील लोकांना मानवी हक्कांची जाणीव झाली असे मानावे लागेल हे हक्क खालीलप्रमाणे होते.

१) नागरिकांचेस्वातंत्र्य,नागरिकांच्यासंपत्तीचेसंरक्षण,नागरिकांचीसुरक्षाअत्याचाराच्याविरोधातसंघर्षकरण्याचे स्वातंत्र्य

२) अंतिम सत्ता जनतेच्या हाती असावी

३) सर्व मानव जन्माने समान असतील व त्यांच्या अधिकारामध्ये समानता असेल.

४) मानवाला स्वातंत्र्य असले तरी मानव आपले स्वातंत्र्य उपभोगत असतानादुसऱ्यांच्या अधिकाराला बाधा येईल असे स्वातंत्र्य त्यांना नसावे

५) कोणत्याही व्यक्तीला विना चौकशी व विनाकारण अटक करता येणार नाही.

६) कायद्या समोर सर्व व्यक्ती समान आहेत.

७) प्रत्येक मानवाला भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य व मुद्रण स्वातंत्र्य बहाल केलेले असेल.

**अमेरिकन स्वातंत्र्ययुध्द व मानवी हक्क:—**

आधुनिक मानवाच्या इतिहासात मानवाच्या स्वातंत्र्याला व हक्कांच्या जाणीवांना खूप महत्व प्राप्त झाले. कॉस्टिटिनोपलचा पाडाव झाल्यानंतर युरोपचा आशियाशी व्यापार पूर्णपणे खंडीत झाला त्यातूनच आशियाकडे जाणाऱ्या नविन मार्गाचा शोध घेताना अमेरिकेचा शोध लागला अमेरिकेच्या या भूभागावर युरोपमधील वेगवेगळया देशांचे नागरिक स्थिर झाले असले तरी त्यांच्यावर बहुतांशी नियंत्रण ब्रिटीशांचे होते. व्यापारी वृत्तीच्या लालसेने नफेखोराच्या भावनेने ब्रिटीशांनी या ठिकाणी असणाऱ्या जनतेचे शोषण करण्यास सुरवात केली या शोषणाच्या विरोधात म्हणजेच अप्रत्यक्षरित्या मानवी जीवनाला सुखदायी बनविणारे अधिकार मिळवण्यासाठी जॉर्ज वॉशिग्टन यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकन जनतेने कायदेशीर संरक्षणासाठी लढा सुरु केला. इंग्रजांच्या विरोधात १३ घटकराज्यांनी संघटीत होऊन आपल्या स्वातंत्र्यासाठी आणि हक्कांसाठी मागण्या सुरु केल्या. ''प्रतिनिधीत्व नाही तर कर नाही'' अशा घोषणा देऊन इंग्रज सरकारने सुरु केलेल्या मुस्कटदाबी विरुध्द संघर्ष केला. इंग्रजांनी या संघर्षाला विरोध केल्यानंतर ४ जुलै १७७६ ला स्वातंत्र्याचा जाहीर नामा प्रसिध्द झाला. यामध्ये जन्मत: मानव समान आहे. त्याला अधिकारांची प्राप्ती निसर्गातूनच झाली आहे.यानंतर हे अधिकार १७८९ मध्ये अमेरिकन राज्यघटनेमध्ये याचा समावेश केला गेला. तयानंतर १७९१ मध्ये हक्कांची सनद याला जोडली गेली अमेरिकन नागरीकांना जास्त अधिकार प्रदान करुन शासनसंस्थेकडे व्यवस्थापनासाठी आवश्यक अधिकार दिले गेले. ते खालीलप्रमाणे

१) धार्मिक स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य व मुद्रण स्वातंत्र्य २) शस्त्र खरेदी व बाळगण्याचा अधिकार
३) नि:पक्षपाती न्यायदान आणि संपत्ती मिळविण्याचा अधिकार ४) प्रौढ मताधिकाराचा अधिकार
५) दास्य प्रथेचे निमूर्लन, जात व रंगभेदावर आधारित नागरीकांना हक्कांपासून वंचित केले जाणार नाही.

**मार्क्सवादी क्रांती व मानवी हक्क:—**पहिले महायुध्द व दुसरे महायुध्द या दोन्ही महायुध्दाच्या पाठीमागे सर्वात मोठे कारण बाजारपेठांची उपलब्धता करणे हाच होता. औद्योगिक क्रांती नंतर युरोपमध्ये झालेले प्रचंड पक्क्या मालाचे उत्पादन आणि तो माल खपविण्यासाठी आफ्रीका व आशिया खंडातील देशांच्यावर वर्चस्व मिळविण्यासाठी सुरु असलेली जीवघेणी स्पर्धा यातून जगातील मानवी समाजाला दोन महायुध्दाचा तडाखा बसला. या नफेखोरीच्या बाजारात मानवी अधिकार आणि हक्क यांची किंमत शून्य बनली. कारखान्यात काम करणारा कामगार यंत्राचा भाग बनला त्याच्या मन, भावना, इच्छा याचा विचार भांडवलशाही सोडून दिला आणि केवळ नफा मिळविण्यासाठी कामगार, लहान मुले, स्त्रिया यांचे शोषण सुरु झाले यामुळेच कार्ल मार्क्स व एगंल्स यांनी भांडवलशाही प्रवृत्ती कडून मानवाचे होणारे शोषण या विरोधात दास कॅपीटल हा ग्रंथ लिहला यामधून भांडवलशाही व्यवस्थेमधून होणारे मानवी हक्कांची पायमल्ली याचे विदारक चित्रण आपल्याला दिसून येते. मार्क्सने आपल्या विचारात स्वातंत्र्य, समता, व न्याय या गोष्टी आर्थिक सिध्दांतावर अवलंबून असल्याचे सांगितले मार्क्सवादाच्या मते हक्क कायदेशीर मार्गाने दिले जात नाहीत तर ते ऐतिहासिक विकासाच्या मार्गाने वर्ग संघर्षातून निर्माण झालेले आहेत.

मार्क्सच्या मते साम्यवादी तत्वज्ञानाच्या आधारे प्रस्थापित राज्यव्यवस्था नष्ट करुन क्रांती घडवून आणली पाहिजे. प्रस्थापित राजकीय व सामाजिक परिस्थितीच्या विरोधात संघर्ष करुन कामगारांची क्रांती जगभर घडवून आणली पाहिजे तरच हक्कांची प्राप्ती होईल. व्यक्तीला भुकेल्या अवस्थेत व्यक्तिगत स्वातंत्र्य दिले असता त्याचा त्याला काहीही उपयोग नाही मानवाचे शोषण, बेरोजगारी ही ज्यावेळी संपवीली जाईल त्याचवेळीह खऱ्या अर्थाने व्यक्ती स्वतंत्र होईल. त्यामुळेच मार्क्सवाद केवळ राज्यघटनेने मानवाला दिलेल्या अधिकराबाबत समाधानी नाही. तर नागरिकांना व्यवस्थेमध्ये अधिकार उपभोगता येतील अशी शोषण रहीत व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. मानवधिकाराच्या बाबतीत मार्क्सवाद संपूर्ण समाजाला केंद्रस्थानी मानतो. व्यक्तीगत संपत्ती व नफा याला मार्क्सने स्थान दिले नसून शेतकरी व कामगार यांना व त्यांच्या अधिकारांना महत्व दिले आहे मानवी हक्कांच्या दृष्टीकोनातून मार्क्सवादाने व्यक्त केलेले तत्वज्ञान महत्वाचे आहे. कारण मानवी हक्क केवळ राज्यघटनेद्वारे प्रदान करुन उपयोगी नाही तर प्रस्थापित राज्यव्यवस्थेत हक्कांचे शोषण करणा—या पध्दती व निर्माण झालेली केंद्रे उध्वस्त झाली पाहिजेत मानवी हक्कांच्यावर औद्योगिक क्रांती नंतर झालेले अतिक्रमण मोडून काढून जगासमोर एक पर्यायी भक्कम व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य मार्क्सवादी तत्वज्ञानाचे केले.

**मानवी हक्क विषयक सिध्दांत** .मानवी हक्कांच्या बाबतीत शासनसंस्था व जनता यांचे संबंध निश्चित होत असतानाच शासनसंस्थेच्या अस्तिवाबरोबरच मानवाला स्वत:चे अस्तित्व टिकवणे गरजेचे होते. त्यामुळेच मानवी हक्कांच्या रक्षणाची जबाबदारी शासनसंस्थेवर आली शासनसंस्था सुशासन निर्माण करीत असतानाच मानवाच्या हक्कांचे संरक्षण करुन मानवाला विकासासाठी योग्य परिस्थिती निर्माण करीत होते. मानवी हक्कासंबंधी मांडलेल्या वेगवेगळया सिध्दांतामध्ये याबाबतचा अर्थ स्पष्ट होतो. ते सिध्दांत खालीलप्रमाणे

**१) नैसर्गिक सिध्दांत:—**१७ व्या शतकात जॉन लॉक याचा अनुभववाद थॉमस हॉब्ज यांचा भौतिकवाद द्वारे या विचारवंतानी निसर्गातनू मानवला मानव असल्यामुळेच अधिकार प्राप्त होतात याचा जोरदार पुरस्कार केला मानवाचे हक्क कोणतीही शासनव्यवस्था काढून घेऊ शकत नाही. कारण हक्क हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. व्यक्ती व्यक्ती मध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वाना समान अधिकार निर्सर्गानेच दिले आहेत असे हा सिध्दांत मानवाचे मत आहे. वरील विचारवंताच्या बरोबरच जीन जेम्स, मॉटेस्कू व रुसो यांनी देखील या सिध्दांताचे समर्थन केले जॉन लॉक याने १६८८ च्या इंग्लडमधील वैभवशाली राज्यक्रांती च्या अनुषंगाने विचार करता असे मानले आहे की मानवाला जीवन जगण्याचा अधिकार संपत्ती विषयक अधिकार आणि स्वातंत्र्य विषयक अधिकार हे नागरी समाजामध्ये प्रवेश करण्यापूर्वीच प्राप्त झाले आहेत. नागरी समाजामध्ये आल्यानंतर मानवाने संपूर्ण समाजासाठी स्वत: बंधने घालून यामधील काही अधिकार राज्य संस्थेकडे दिले एलेन पैजल्स यांच्या मते मानवाकडे पूर्वी पासूनच अधिकार आहेत. त्यामुळे समाजाने त्याला मान्यता दणे आवश्यक आहे यावरुनच असे स्पष्ट होते की मानवाला निसर्गातच अधिकारांची प्राप्ती झाली आहे त्यामुळे शासनसंस्थेला या अधिकारांना मान्यता द्यावीच लागेल परंतु शासनसंस्थेने हे अधिकार मानले नाहीत तर नागरिकांनी स्वत: हक्कांसाठी संघर्ष करणे गरजेचे आहे इंग्लडमध्ये १६८८ मध्ये नागरीकांनी केलेला उठाव अशाच स्वरुपातून निर्माण झाला होता.

**२) ऐतिहासिक सिध्दांत:—**समाजामध्ये रिती रिवाज, रुढी—परंपरा या अनादी काळापासून चालत आलेल्या असतात अशा परंपरांना राज्य मान्यता देते. कालांतराने राज्याने अशा रुढी व परंपरांना कायद्याचे स्वरुप दिले म्हणजेच बऱ्याच कालावधी साठी समाज एका दिशेने वाटचाल करीत असतो ज्या वाटेवरुन समाज जात असतो समाजातील प्रत्येक व्यक्ती त्याच दिशेने वाटचाल करते कालांतराने ते त्या व्यक्तींचे हक्क बनतात. मॅक आयव्हर या समाजशास्त्रज्ञाच्या मते कायदा म्हणजे खूप वर्षे चालत आलेल्या परंपरा आहेत की ज्यांना राज्यसंस्थेने कायदा म्हणून मान्यता दिली आहे. तसचे एडमंड बर्क यांच्या मते व्यक्ती एखाद्या गोष्टीचा वापर बऱ्याच कालावधीसाठी करत असेल तर त्यावर त्या

व्यक्तीचा हक्क असतो. मानवी हक्क सुध्दा असेच आहेत. मानव अनादी काळापासून जिवित स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य यांचा उपभोग घेत आहे त्यामुळेच राज्य संस्थेने या मानवाच्या हक्कांचे रुपांतर कायद्यात भरुन त्याला संरक्षण दिले आहे. फ्रेंच राज्यव्यवस्थेमध्ये ज्यावेळी मानवाच्या अशा हक्कांना बाधा आणणारे कायदे अंमलात आणले जावू लागले त्यावेळी फ्रेंच जनतेने ही राज्यव्यवस्था मुळापासून उखडून टाकून नवीन राज्यव्यवस्था निर्माण केली मानवी इतिहासामध्ये अनेक पिढया चालत आलेले हक्क म्हणजेच मानवी हक्क आहे असे या सिध्दांताने समर्थन करणाऱ्या विचारवंताचे मत आहे.अनादी काळापासून चालत आलेल्या परंपरांना कायद्याचे व हक्कांचे स्वरुप दिले असले तरी अस्पृश्यता बालहत्या यासारख्या रुढी कायदे किंवा हक्क बनू शकत नाहीत. त्यामुळे समाजात चालत आलेल्या परंपरा चांगल्या असतीलच असे नाही. समाजातील वाईट प्रथा नष्ट करुन नव्या संकल्पना अस्तित्वात आणल्या जातात हेच मानवी हक्क असतात.

**३) आदर्शवादी सिध्दांत:—**आदर्शवादी सिध्दांतामध्ये व्यक्तीच्या विकासाला महत्व दिले आहे. व्यक्तीच्या विकासाला आवश्यक परिस्थिती व्यक्तीला हक्क प्रदान केल्या नंतरच होत असते. हक्क म्हणजे व्यक्तीच्या विकासासाठी निर्माण केलेली आवश्यक बाह्य परिस्थिती होय. त्यामुळेच हक्क विषयक आदर्शवादी सिध्दांताला 'व्यक्तीमत्व सिध्दांत' असे देखील म्हटले जाते. आधुनिक काळात टी. एच. ग्रीन. बोझाके हे या सिध्दांताचे पुरस्कर्ते आहेत. ग्रीन यांच्या मते मानवाला नैतिक जीवन जगण्यासाठी आणि स्वातंत्र्यासाठी हक्कांची आवश्यकता असते. क्राज यांच्या मते अधिकार मानवाच्या हक्कांची गरज असते. मानवाला इतर अधिकार तरी दिले तरी व्यक्तीमत्व विकासाचा अधिकार त्याला दिल्याशिवाय इतर अधिकारांना अर्थ प्राप्त होत नाही.आदर्शवादी सिध्दांतानुसार हक्कांच्या दोन बाजू आहेत. एक म्हणजे प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या विकासासाठी हक्क आवश्यक आहेत. त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीला हक्क मिळाले तरी समाजासाठी व राज्यासाठी व्यक्तीचे कर्तव्य असते की ज्यानुसार व्यक्तीने आपल्या अधिकारांचा गैर वापर करु नये. व्यक्तीने अधिकारांचागैरवापर केल्यासत्याचे हक्कगोठविण्याचा अधिकार समाजाला असतो. त्यामुळेच व्यक्ती आपल्या ध्येय प्राप्तीसाठी स्वत:च्या व्यक्तीमत्वाचा विकास करुन घेत असते व्यक्तीला आपल्या ध्येयाची प्राप्ती होणे हेच त्याला मिळालेल्या हक्कांची यश असते. असे आदर्शवादी सिध्दांतामध्ये मानले जाते.

**४) सामाजिक कल्याण सिध्दांत:—**हक्कांविषयी सामाजिक कल्याण सिध्दांत एक महत्वाचा सिध्दांत आहे. या सिध्दांतानुसार व्यक्तीला दिले जाणारे अधिकार समाजाद्वारे दिले जातात. ज्याच्यामुळे समाजाचे कल्याण होते. म्हणजेच या हक्कांच्या मुळे समाजाचे हित साधले जावून समाजाचे कल्याण होते. जेरमी बेल्यॅम व जॉन स्टुअर्ट मिल यांच्या उपयुक्ततावादी सिध्दांताचा प्रभाव यावर जास्त आहे. प्रा. लास्की यांनी देखील या सिध्दांताचे समर्थन केले आहे. या विचारवंताच्या मते हक्क उपयोगी असावेत समाजातील जास्तीत जास्त लोकांना त्याचा फायदा व्हावा एखाद्या हक्कांमुळे समाजाच्या हिताला बाधा ठरत असेल तर तो अधिकार चूकीचा असेल मिल यांच्या मते व्यक्तीचे अधिकार समाजातील जास्तीत जास्त लोकांना सुख देणारे असावेत लास्की यांच्या मते समाजातून केवळ अशा व्यक्तीच्या अधिकारांना मान्यता दिली जाते की ज्या अधिकारांच्या मधून समाजाचे कल्याण साधले जाते. म्हणजेच कोणताही कायदा,रुढी, परंपरा हा समाजाच्या दृष्टीने कीतपत उपयोगी आहे या वरुनच त्या समाजाने कायदे रुढी, परंपरा टिकून राहातात मानवी हक्कामध्ये आर्थिक व सामाजिक अधिकार सामाजिक कल्याणाच्या सिध्दांताच्या आधारेच समाविष्ट केले आहेत व्यक्तीच्या हितामध्येच समाजाचे हित असते व्यक्तीच्या विकासाबरोबरच समाजाचे हित साधले जाते हेच या सिध्दांतबरुन स्पष्ट होते.

**५) वैधानिक सिध्दांत:—**वैधानिक सिध्दांतांचा पुरस्कार जेरमी बेथॅम जॉन ऑस्टिन, हॉलंड यांनी केला. यांच्या मते व्यक्तीला हक्क राज्याने दिले आहेत. व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण राज्य करत असल्यामुळे व्यक्तीला त्या हक्कांचा उपभोग घेता येतो. मानवाला हक्क निसर्गातून मिळतात याला त्यांनी पूर्ण विरोध केला आहे. बेथॅम यांच्यामते तर मानवाला प्राप्त झालेल्या हक्कांना राज्याने मान्यता दिली तरच त्याला योग्य अर्थ प्राप्त होतो. यावरुन असे स्पष्ट होते की राज्य व्यक्तीला नवीन हक्क प्रदान करते जुने हक्क रद्द करु शकते. राज्याची मान्यता असेपर्यतच व्यक्ती त्या हक्कांचा उपयोग घेऊ शकते.या सिध्दांताने हक्कांचे उगमस्थान राज्य असल्याचे समर्थन केले आहे. त्यामुळे राज्याशिवाय अधिकार किंवा हक्क असूच शकत नाहीत. व्यक्तीचे अधिकार स्पष्ट करुन त्या अधिकाराच्या कक्षा निश्चत करणे व तया अधिकारांचा उपभोग व्यक्तीला घेता यावे असे वातावरण निर्माण करणे. अशी व्यवस्था राज्य कटाक्षाने करत असते. राज्याने दिलेल्या हक्कांचे योग्य प्रकारे नियमन केले जाते. व्यक्तीला हक्क मिळाल्यानंतर व्यक्तीकडून कायद्याचे योग्य प्रकारे पालन व्हावे. यासाठी राज्य दंडशक्तीचा वापर करत असते. त्यामुळे नागरीकांकडून हक्कांच्या उपभोगाबरोबरच त्याच्या कडून कर्तव्याचे पालन देखील चांगल्या प्रकारे होत असते. अशा प्रकारे हक्कांना राज्याने नियंत्रीत केले आहे.

थोडक्यात मानवी हक्कांच्या सैध्दांतिक विश्लेषणामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक अधिकार येतात. हॉब्ज लॉक रुसो यांनी प्रामुख्याने मानवाला हक्क निसर्गातून मिळतात याचे जोरदार समर्थन केले आहे. याला जीन जेम्स व मॉटेस्क्यूने देखील पाठिंबा दिला आहे. याच्या मतानुसार मानवाला संपत्तीचा अधिकार, स्वातंत्र्य हे सर्व नागरी समाजामध्येच मिळाले आहेत त्यामुळेच त्यांनी समाजामध्ये आल्यानंतर स्वत:ला बंधने घातली व आपल्या मधून काही अधिकार काढून राज्यसंस्थेला दिले. मात्र राज्यसंस्थेने मानवाला मिळालेले नैसर्गिक अधिकार आहे. यावरुन मानवामध्ये

कितीही भिन्नता असली तरी मानव नैसर्गिक हक्कांचा दृष्टीकोनातून सर्व मानव समान आहेत. ऐतिहासिक सिध्दांतामध्ये नैसर्गिक स्वातंत्र्यापेक्षा समाजातील रुढी परंपरांना महत्व दिले आहे. मॅक आयव्हर, एडमंड बर्क यांच्या मते कायदा म्हणजे खूप वर्षे चालत आलेल्या परंपरा आहेत त्यालाच पुढे राज्याने कायदा म्हणून मान्यता दिलेली आहे. मानव अनादि काळापासून जिवित स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य यांचा उपभोग घेत आहे. स्वातंत्र्याची ही ऐतिहासिक वाटचाल मान्य करुन राज्य संस्थेने त्याला कायद्याचे स्वरुप देऊन त्यांचे संरक्षण करणारी यंत्रणा उभी केली आहे. मात्र समाजातील वाईट प्रथा, परंपरा उदा. अस्पृश्यता, बालहत्या या सारख्या समाजाला कलंकित करणा—या रुढी परंपरांना मात्र राज्याने मान्यता दिलेली नाही. आदर्शवादी सिध्दांतामध्ये टी.एच.ग्रीन, बोझांके यांनी हक्क म्हणजे व्यक्तीविकासाचे साधन मानले आहे. कारण मानवाला मिळालेल्या हक्कांमुळेच मानव समाजात आपला विकास करु शकतो मानवाला इतर अधिकार दिले तरी त्याला व्यक्तीविकासाचा अधिकार दिल्या शिवाय इतर अधिकारांना अर्थ प्राप्त होत नाही. त्याचबरोबर अधिकार उपभोगत असताना व्यक्तीने स्वत:वर नैतिक बंधने घालून घेऊन स्वत:च्या कर्तव्याच्या देखील विचार केला पाहिजे असे या सिध्दांताने स्पष्ट केले आहे. व्यक्तीने स्वत:च्या अधिकाराचा गैरवापर करु नये. कारण समाजासाठी व राज्यासाठी व्यक्तींची काही कर्तव्ये असतात. व्यक्तीने आपल्या कर्तव्याचा विचार केला नाही तर राज्य व्यक्तीचे अधिकार गोठवू शकते. जेरेमी बेथॅम व जॉन मिल यांनी सामाजिक कल्याण सिध्दांत मांडला त्यांच्यामते व्यक्तीला हक्क समाजातून दिले जातात. त्यामुळे समाजाचे देखील हित साधले जाते. यावर उपयुक्ततावादी सिध्दांताचा प्रभाव जास्त आहे. प्रा. लास्की यांच्यामते समाजात रुढी, परंपरा व कायदे कितपत उपयोगी आहेत. यावरच ते समाजात टिकून राहतात अन्यथा ते निरुपयोगी बनल्यामुळे राज्य ते नष्ट करते. या सिध्दांताने व्यक्तीच्या हितामध्ये समाजाचे हित साधले जाते असे स्पष्ट केले आहे. यानंतर वैधानिक सिध्दांतामध्ये जॉन ऑस्टीन, हॉलंड, बेथॅम यांच्या मते व्यक्तीला मिळालेले हक्क निसर्गाने दिलेले आहेत हे अमान्य केले आहे. राज्य व्यक्तीला नविन हक्क देते. जुने हक्क रद्द करु शकते राज्याची मान्यता असे पर्यत व्यक्ती त्या अधिकारांचा उपभोग घेऊ शकते. म्हणजेच वैधानिक सिध्दांताच्या मते हक्कांची निर्मिती राज्याकडूनच केली जाते. त्याबरोबरच राज्याच्या कायद्याचे पालन व्यक्तीकडून व्हावे यासाठी दंडशक्तीचा वापर राज्याकडून केला जातो त्यामुळे राज्यासाठी आवश्यक असणारे कायदापालन योग्य प्रकारे केले जाते. त्याच्यामते या व्यवस्थेमुळेच हक्कांचा उपभोग घेत असताना व्यक्तींना राज्यामध्ये कायदा पालनाची सवय लागते.

**मानवी हक्कांची सनद:—**मानवी जगाच्या इतिहासात औद्योगिक क्रांती, अमेरिकन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती पहिले महायुध्द, रशियन साम्यवादी क्रांती दुसरे महायुध्द, आशिया व आफ्रीका या खंडामध्ये साम्राज्यवादी प्रवृत्ती विरुध्द झालेला संघर्ष या सर्व घटनांचे अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. यामध्ये जरी संघर्ष राजकीय किंवा आर्थिक स्वरुपाचा असला तरी यामध्ये प्रामुख्याने मानवाचे अस्तित्व व मानवी हक्कांचे संरक्षण या बाबीच महत्वाच्या असतात. दुस—या महायुध्दाच्या समाप्तीनंतर २४ ऑक्टोंबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघ स्थापन करण्यात आला. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून मानवाच्या हाती विनाशकारी शस्त्रास्त्रे आली त्यामुळे संपूर्ण मानव जातीच्या समोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. युध्दाला हिंसक वळण प्राप्त झाले. म्हणूनच दुसरे महायुध्द सुरु असतानाच मानव जातीला व जगाला युध्दाच्या धोक्यापासून मुक्त करण्यासाठी एखादी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याचे प्रयत्न सुरु झाले. त्यातूनच संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली.संपूर्ण मानव जातीचे येणा—या संकटापासून संरक्षणाची जबाबदारी संयुक्त राष्ट्रसंघाने घेतली यासाठी मानवी प्रतिष्ठेच्या रक्षणालाही तितकेच महत्व दिले आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांचे रक्षण करणे हे संयुक्त राष्ट्राचे उद्दिष्ट असले तरी युरोपातील राष्ट्रांना व अमेरिकेला मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य याची हमी मिळाल्याशिवाय आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांचे रक्षण करणे शक्य नाही हे लक्षात आले होते. त्याचाच परिणाम म्हणून मानवी हक्कांचे रक्षण करुन मानवी प्रतिष्ठा आबाधित राखण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**संयुक्त राष्ट्रसंघटनेत मानवी हक्कांसंबंधी तरतूदी:—**संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करताना २५ एप्रिल १९४५ ते २६ जून १९४५ या दरम्यान अमेरिकेतील सॅनफ्रसिसको परिषदेत जगातील ५० राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला या परिषदेने २५ जून १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेला मंजूरी दिली. या सदनेत एकूण १९ प्रकरणे असून त्यात १११ कलमांचा समावेश करण्यात आला. या सनदेच्या मानवी प्रतिष्ठेचे रक्षण करणे हा महत्वाचा उद्देश मानला होता. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघटेच्या सनदेत मानवी हक्कांसंबंधी स्पष्ट तरतूदी करण्यात आल्या आहेत.

**१) कलम १** — संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत पहिल्या कलमात सांगितले आहे. की वंश, धर्म, लिंग, भाषा या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वाना मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य वृध्दींगत करणे व त्यांना सन्मान प्राप्त करुन देणे यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळविणे हे संयुक्त राष्ट्रसंघाचे एक उद्दिष्ट असेल.

**२) कलम १३** — यामध्ये वंश, लिंग, भाषा व धर्म यावर आधारित कोणताही भेदभाव न करता सर्वाना मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्ये यांचा लाभ मिळवून देण्यासाठी शिफारशी करण्याची जबाबदारी या कलमान्वये संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेवर टाकण्यात आली आहे.

**३) कलम ५५** — यामध्ये असे म्हटले आहे की वंश, लिंग, भाषा व धर्म या आधारावर कोणताही भेदभाव न करता सर्वासाठी मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्ये यांचे संरक्षण करणे आणि त्याबाबत सार्वत्रिक आदर वृध्दींगत करणे हे संयुक्त राष्ट्रसंघाचे कर्तव्य असेल.

**४) कलम ५६** – यामध्ये असे म्हटले आहे की संयुक्त राष्ट्रसंघाची सर्व सदस्य राष्ट्रे कलम ५५ मध्ये सांगितलेली उद्दीष्टये साध्य करण्यासाठी संघटनेच्या सहकार्याने एकत्रीत पणे स्वतंत्रपणे कृती करतील.

**५) कलम ६२** –प्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघाची आर्थिक व सामाजिक समिती सर्वासाठी मानवी हक्क मानवी स्वातंत्र्य याचा सन्मान वृध्दींगत करण्यासाठी तसेच त्यांचे पालन करण्यासाठी शिफारशी सुचवेल अशी तरतूद करण्यात आली

**६) कलम ७३** – प्रमाणे स्वयंशासित नसलेल्या प्रदेशातील लोकांच्या मानवी हक्कांचे रक्षण करण्याची आणि सर्व बाबतीत त्यांना न्याय देण्याची जबाबदारी त्या प्रदेशाच्या प्रशासनाचे कार्य जबाबदारी घेतलेल्या सदस्य राष्ट्रावर सोपविण्यात आली आहे.

**७) कलम ७५** – प्रमाणे विश्वस्त प्रदेशातील लोकांच्या मानवी हक्कांचे रक्षण करण्याची आणि ते प्रदेश राजकीय दृष्टया स्वतंत्र होण्याची क्षमता प्राप्त करतील या दृष्टीने त्यांचा विकास घडवून आणण्याची जबाबदारी विश्वस्त समितीवर सोपविण्यात आली आहे.

**मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा** – १९४८ साली युनोच्या आमसभेने मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा मंजूर केला. साधारणपणे यामध्ये ३० कलमे आहेत. यामध्ये मुलभूत हक्क व मुलभूत स्वातंत्र्याचे वर्णन दिले आहे. यातील पहिल्याच कलमामध्ये अखिल मानव जात जन्मानेच स्वतंत्र व समान आहे की ज्यामुळे मानवाची प्रतिष्ठा आणि अधिकार यांची त्यांच्याकडून बंधुभावाने आणि जाणीवपूर्वक जोपासना होते मानवी हक्कांसाठी कायद्याच्या शक्तीपेक्षा नैतिक शक्तीवर भर दिला. नैतिक अधिष्ठाना मुळेच राज्ये नागरी मानवी हक्कांची व मुलभूत हक्कांची जोपासना व संरक्षण करीत असतात.

**मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यात नमूद केलेले हक्क**

१) व्यक्तीच्या जिविताचा आणि सुरक्षिततेचा हक्क – कलम ३ २) गुलामगिरी व दास्यप्रथा प्रतिबंधाचा हक्क – कलम ४ ३) कायद्यासमोर समान वागणुकीचा हक्क –कलम ७ ४) घटनात्मक उपाययोजनाचा हक्क – कलम ८
५) जुलमी अटक, अन्याय या विरुध्दचा हक्क – कलम ९ ६) स्वकष्टार्जित संपत्तीचा हक्क – कलम १७
७) चळवळीचा स्वातंत्र्याचा हक्क – कलम ७–१३ (१) ८) विचार, धर्म, जाणीवजागृतीचा हक्क –कलम १८
९) लोकमत वअभिव्यक्तीचा अधिकार कलम१९ १०) शांततेने एकत्र येणे व संघटना स्थापन करणे कलम २० (१)
११) सामाजिक सुरक्षिततेचा हक्क – कलम २२ १२) व्यापारी संघटना स्थापन करण्याचा हक्क कलम २३ (४)
१३) सार्वजनिक संवात समान संधीचा हक्क कलम २१(२) १४) पूर्वलक्षी (गतकालाला लागू असणारा) कलम ११

**ब) आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक हक्क** १) काम करण्याचा हक्क, रोजगार निवडण्याचा हक्क – कलम २३(१)
२) समान कामासाठी समान वेतन देण्याचा हक्क – कलम २३(२)
३) योग्य व समाधानकारक मोबदला मिळविण्याचा हक्क – कलम २३(३)
४) विश्रांती व समाधान मिळविण्याचा हक्क – कलम २४
५) स्वत:ला आणि स्वत:च्या कुटूंबाला राहणीमानाचा परिपूर्ण दर्जा प्राप्त करण्याचा अधिकार – कलम २५
६) प्राथमिक व पायाभूत मोफत शिक्षण घेण्याचा हक्क – कलम २६(१)
७) योग्य सामाजिक सुव्यवस्था मिळविण्याचा हक्क – कलम २८

याशिवाय १९६६ मध्ये मानवी हक्कांच्या संदर्भात सुधारणा केलेल्या आहेत. उदा. व्यक्तीच्या जिविताचा स्वातंत्र्याचा सुरक्षिततेचा हक्क कलम ६(१) व ९(१) मध्ये दिलेला आहे. न्यायालयापुढे आणि न्यायाधिकरणापुढे व्यक्तीला समान वागणूक देण्याचा हक्क कलम १४(१) मध्ये दिला आहे. राज्यांनी दुय्यम शिक्षणाची सोय करणे कलम १३(अ), लहान मुलांची व तरुणांची सुरक्षितता कलम १०(३) इ. विविध मानवी हक्क कराराद्वारे या दोन्ही सनदात नमूद केलेले आहेत.थोडक्यात मानवाने कुटूंबानंतर समाजामध्ये प्रवेश करताना राज्यव्यवस्था निर्माण केली. या राज्यव्यवस्थेचा मूळ हेतू मानवी जीवनाला स्थिरता देऊन मानवाचा विकास घडवून आणणे हाच होता. मानवाच्या एकूण ऐतिहासिक प्रवासात अनेक स्थित्यंतरे आली. या सर्वामधून जात असताना समाजात कायदा व सुव्यवस्था निर्माण करुन मानवांची प्रगती करण्याचा हेतू मानवाने साध्य केला. मानवाला प्राप्त झालेले हक्क या कायद्याद्वारे संरक्षीत केले जातात. अशा हक्कांना डावलणा–या घटकांना राज्यव्यवस्थेकडून कडक शासन केले जाते. म्हणजेच मानवी हक्कांचे संरक्षण करुन मानवाच्या विकासासाठी प्रस्थापित राज्यव्यवस्था सातत्याने जागरुक असते.

**संदर्भ ग्रंथ सूची:**१) राज्यशास्त्र – सामाजिक संकल्पना सिध्दांत कोष – डॉ. बी. आर. जोशी, डायमंड पब्लीकेशन
२) राज्यशास्त्र सिध्दांत आणि संकल्पना – प्रा. बी.बी.पाटील, फडके प्रकाशन.
३) राज्यशास्त्राची मूलतत्वे – प्रा. चिं. ग. घांगरेकर, श्री. मंगेश प्रकाशन.
४) मानवी हक्क – प्रा. व्ही. बी. पाटील, के सागर प्रकाशन.
५) मानवाधिकार – नेहरु और आंबेडकर, डॉ. धर्मवीर चंदेल पोइन्टर पब्लीशर्स.
६) मानवाधिकार हे विविध आयाम – भावना वर्मा, नरेंद्र शुक्ल पोइन्टर पब्लीशर्स.
७) मानवाधिकार दशा और दिशा – दामोदर मिश्रा, आखिल शुक्ला पोइन्टर पब्लीशर्स.